नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २६६ Issue - 266 | वार रविवार दि. १५ फेब्रुवारी २०२६ Blow- Sunday Date 15 February 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# पंतप्रधान मोदींच्या हस्ते देशातील पहिल्या विशेष 'इमर्जन्शी लँडिंग' सुविधेची सुरुवात




## ब्रह्मपुत्र नदीवर बांधलेल्या कुमार भास्कर वर्मा पुलाचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आसाम: यावर्षीच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी आसाममध्ये राजकारण तापले आहे. राजकीय पक्षांकडून निवडणुकीची जोरदार तयारी सुरु आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींचा आसाम दौरा महत्वाचा ठरत आहे.

पंतप्रधान मोदी यांनी या आसाम दौऱ्यादरम्यान ब्रह्मपुत्र नदीवर बांधलेल्या कुमार भास्कर वर्मा पुलाचे उद्घाटन केले. हा पूल गुवाहाटीला उत्तर गुवाहाटीशी जोडतो. हा ईशान्य भारतातील पहिला विस्तारित पूल आहे.

तसेच शनिवारी आसाममधील मोरन बायपासवर कडक उन्हात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ईशान्येकडील पहिल्या आपत्कालीन लँडिंग सुविधेचेही उद्घाटन केले. पंतप्रधान मोदींनी भारतीय हवाई दलाच्या सी-१३०जे या विमानातून ऐतिहासिक लँडिंग करून या सुविधेचे उद्घाटन केले.

त्याचवेळी, भारतीय हवाई दलाच्या सुखोई एसयू-३० एमके आयने दिब्रुगडमधील मोरन बायपासवरील आपत्कालीन लँडिंग सुविधा (ईएलएफ) वरून उड्डाण केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपस्थित असलेल्या इतरांनी टेकऑफ पाहिले.

तत्पूर्वी, पंतप्रधान मोदी दिब्रुगडमधील मोरन बायपासवरील आपत्कालीन लँडिंग सुविदेवर उतरले. पंतप्रधान नरेंद्र मोदी सी-१३०-जे सुपर हरक्यूलिस विमानातून ईएलएफमध्ये उतरले तेव्हा तो एक ऐतिहासिक क्षण होता. त्यानंतर त्यांनी लढाऊ, वाहतूक विमाने आणि हेलिकॉप्टरचा एअर शो पाहिला. ईशान्य भारतातील अशा प्रकारची ही पहिलीच सुविधा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. त्याच्या बांधकामामुळे आपत्कालीन परिस्थितीत लष्करी आणि नागरी विमानांचे लँडिंग आणि टेकऑफ करणे सोपे होणार आहे.

आपत्कालीन लँडिंग सुविधा (एडक्र) ही युद्ध आणि आपत्कालीन परिस्थितीसाठी एक पर्यायी धावपट्टी सुविधा आहे. युद्ध किंवा आपत्कालीन परिस्थितीत लढाऊ विमाने, वाहतूक विमाने आणि हेलिकॉप्टरसाठी पर्यायी लँडिंग साइट प्रदान करण्यासाठी महामार्गावर एक पट्टी बांधली जाते. ही सुविधा म्हणजेच एडक्र ४० टन वजनाचे लढाऊ विमान आणि ७४ टन पर्यंत जास्तीत जास्त टेकऑफ वजनाचे वाहतूक विमान हाताळण्यास सक्षम आहे.

देशभरात २८ एडक्र ची योजना आहे. सध्या, आसाम वगळता देशात अशा पाच सुविधा आहेत. आसाममधील ही सुविधा देखील महत्त्वाची आहे कारण ती चीन सीमेजवळ आहे. जी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाची आहे.

# मुलुंड अपघात प्रकरणी कारवाईला वेग, पाच अधिकाऱ्यांना अटक अन् कंपनीवर गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुलुंड मेट्रोचा स्लॅब पडून झालेल्या अपघात प्रकरणात आता कारवाईला जोर आला असून आतापर्यंत पाच जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच मिलन रोड बिल्डटेक या रिलायन्स अस्तालदी कंपनीच्या कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात प्रोजेक्ट डायरेक्टर हरीश चौहान, प्रोजेक्ट मॅनेजर कुलदीप सपकाळ, डेप्युटी मॅनेजर सौरभ सिंह, सुपरवायर प्रशांत भोईर आणि अवधूत इनामदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



अवधुत इनामदार हे डीबी हिल एलबीजी कंपनीशी सबंधित असल्याची माहिती आहे. मुलुंड दुर्घटनेला जबाबदार धरत एक्झिक्युटिव्ह इंजिनियर सत्यजीत साळवे यांचं निलंबन करण्यात आलं आहे. तसे आदेशच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिले आहेत. मेट्रो ब्रीज मार्गाचे सेफ्टी आणि स्ट्रक्चरल ऑडिट करावं असे निर्देश एकनाथ शिंदेंनी दिले आहेत. मेट्रो मार्गाचं बांधकाम करणाऱ्या लुई बर्गर कंपनीला एक कोटींचा दंड तर अपघाताला जबाबदार असणाऱ्या मिलन इंफ्रा कंपनीला पाच कोटींचा दंड ठोठावण्यात आला आहे. तर एमएमआरडीएकडून मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना १५ लाखांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे.

मुलुंडमध्ये एलबीएस रोडवर वडाळा ते कासारवडवलीच्या मेट्रोच्या बांधकामाचा स्लॅब कोसळल्यानं मोठी दुर्घटना घडली. यामध्ये एकाचा मृत्यू झाला असून ३ जण जखमी झालेत. तसंच तीन वाहनं स्लॅबखाली दबली गेली. रामधन यादव असं मृत व्यक्तीचं नाव असून ते उत्तर प्रदेशचा रहिवासी होते. मुंबई फिरण्यासाठी आले असता त्यांचा अपघाती मृत्यू झाला.

जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीजवळ सुरू असलेल्या मेट्रोच्या कामावेळी हा स्लॅब कोसळला. एलबीएस रोडवरून ठाण्याकडून मुंबईकडे जाणारी वाहतूक या अपघातानंतर बंद करण्यात आली होती. एमएमआरडीए या संपूर्ण मेट्रो मार्गाचं बांधकाम करत आहे. वेगवेगळ्या चार टप्प्यांचे चार वेगवेगळे कंत्राटदार आहेत.

ज्या टप्प्यात हा अपघात झाला तिथलं बांधकाम टाटा प्रोजेक्टस लिमिटेड आणि चायना हार्बर इंजिनिअरिंग कंपनीकडे आहे. दरम्यान, या अपघातानंतर बंद करण्यात आलेला एलबीएस मार्ग तब्बल ७ तासांनी पुन्हा वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. याप्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली असून मुलुंड पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

### मुंबई फिरायला आले अन् काळाने घाला घातला

दुर्दैवाने, या घटनेत मुंबई फिरण्यासाठी आलेले उत्तर प्रदेशातील रामधन यादव यांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला आहे. रामधन यादव हे उत्तर प्रदेशातील जौनपूरमधील एका गावाचे सरपंच म्हणून काम पाहत होते. ते मित्रासोबत मुंबई फिरण्यासाठी आले होते. कळव्यात एका लग्नासाठी रामधन यादव आणि महेंद्र यादव रिक्षानं निघाले होते. त्याचवेळी मेट्रोचा सिमेंट ब्लॉक रिक्षावर कोसळला.

मुंबई फिरल्यानंतर दोन दिवसात रामधनी यादव उत्तर प्रदेशात जाणार होते. या घटनेची माहिती मिळताच रामधन यादव यांच्या कुटुंबीयांनी रुग्णालयाबाहेर एकच हंबरडा फोडला.

# तेलंगणात स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मतपत्रिकेवर मतदानात काँग्रेसची त्सुनामी; भाजप, बीआरएस अन् एमआयएला धोबीपछाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हैदराबाद : तेलंगणात १२३ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मतपत्रिकेवर पार पडल्या. या निवडणुकीत काँग्रेसने विरोधकांचा धुव्वा उडवत एकहाती यश मिळवलं. १३ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या या निवडणुकांमध्ये एकूण २,९९६ वॉर्डांपैकी २,९९५ वॉर्डांचे निकाल जाहीर झाले आणि बहुमतासाठी आवश्यक असलेल्या १४९८ जागांच्या पुढे जात काँग्रेसने १५३७ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले. टक्केवारीत बोलायचे तर ५१.३ टक्के जागांवर विजय मिळवत काँग्रेसने नागरी पातळीवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. सत्ताधारी काँग्रेसविरुद्ध नाराजी आहे, असा दावा करणाऱ्या विरोधकांना मतदारांनी फारसा प्रतिसाद दिलेला दिसत नाही. भारत राष्ट्र समिती ७८१ जागांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिली, तर भारतीय जनता पक्षला केवळ ३३६ जागांवर समाधान मानावे लागले.

शहरी भागात आपला प्रभाव टिकवून ठेवणाऱ्या ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन ने ७० जागा जिंकल्या. अपक्ष उमेदवारांनी १८३ जागा जिंकल्या. उझख(च) ला १३ आणि इड्झ ला २ जागा मिळाल्या, तर ढऊझ आणि जनसेना पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही. या निवडणुकीतील सर्वात लक्षणीय बाब म्हणजे महिलांचे वाढते प्रतिनिधित्व. एकूण १६३८ महिला निवडून आल्या, तर पुरुषांची संख्या १३५६ राहिली. सामाजिक प्रवर्गांच्या दृष्टीने पाहता, मागासवर्गीय समुदायात सर्वाधिक १६६१ प्रतिनिधींनी विजय मिळवला. निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या शैक्षणिक पार्श्वभूमीवर नजर टाकली असता, ४१.९ टक्के सदस्य पदवीपूर्व शिक्षण घेतलेले आहेत. १५.९ टक्के पदवीधर आणि ६.५ टक्के पदव्युत्तर शिक्षित आहेत. चार सदस्य डॉक्टरेट धारक आहेत.

दुसरीकडे, तेलंगणा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या प्रचंड विजयाबद्दल राज्य सरकारच्या जनहितकारी धोरणांचे प्रमाणीकरण असल्याचे वर्णन केले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले की, निकाल हे सामाजिक न्याय, आदर आणि समावेशक विकासाच्या दृष्टिकोनाला जनतेचा पाठिंबा स्पष्टपणे दर्शवितात. त्यांनी सांगितले की, हा विजय जनतेच्या विश्वासाचा थेट पुरावा आहे. राहुल गांधी यांनी निवडणूक निकालांनंतर एक निवेदन जारी केले, ज्यामध्ये ते म्हणाले की, तेलंगणा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील विजय हा काँग्रेस सरकारच्या लोकप्रिय धोरणांचे प्रमाणीकरण आहे. त्यांनी म्हटले की, पक्षाचे ध्येय प्रजाला तेलंगणा निर्माण करणे आहे, जिथे विकासाचे फायदे प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचतील. राहुल गांधी यांनी काँग्रेस कार्यकर्ते आणि नेत्यांचे आभार मानत म्हटले की, हा विजय तळागाळातील कार्यकर्त्यांचा आणि राज्यातील जनतेचा आहे.

### रेवंत रेड्डी सरकारला बळकटी

हे निकाल ए. रेवंत रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारसाठी एक मोठी राजकीय चालना मानली जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे अनेकदा सरकारच्या कामगिरीवर थेट जनमत म्हणून पाहिले जाते. काँग्रेसचा हा प्रचंड विजय शहरी आणि स्थानिक पातळीवर पक्षाचा पाया मजबूत होत असल्याचे दर्शवितो. बसपा आणि भाजपनेही अनेक ठिकाणी विजय मिळवला, परंतु एकूण आघाडी काँग्रेसच्या बाजूने राहिली.

### हा जनतेच्या विश्वासाचा जनादेश

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही निकालांवर प्रतिक्रिया व्यक्त केली आणि हा जनतेच्या विश्वासाचा जनादेश असल्याचे म्हटले. खरगे म्हणाले की तेलंगणातील जनतेने सामाजिक न्याय, आर्थिक सक्षमीकरण आणि सतत प्रगतीच्या अजेंड्यावर विश्वास ठेवला आहे. त्यांनी राज्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांचे विजयाबद्दल अभिनंदन केले आणि पक्ष आपल्या आश्वासनांवर ठामपणे पुढे जाईल असे सांगितले.

## मोदी सरकारचा 'मास्टरस्ट्रोक'! टर्नओव्हरची मर्यादाही वाढवली

# स्टार्टअप्ससाठी १०,००० कोटींचा 'फंड ऑफ फंड्स २.०' मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय स्टार्टअप्सना जागतिक स्तरावर नेण्यासाठी आणि स्वदेशी गुंतवणुकीला बळ देण्यासाठी केंद्र सरकारने एका ऐतिहासिक निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत १०,००० कोटी रुपयांच्या 'फंड ऑफ फंड्स २.०' (FoF 2.0) ला प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. शनिवारी, १४ फेब्रुवारी २०२६ रोजी या निर्णयाची अधिकृत घोषणा करण्यात आली.

### स्टार्टअप इंडियाचा 'नेक्स्ट लेव्हल' प्रवास

२०१६ मध्ये केवळ ५०० स्टार्टअप्सपासून सुरू झालेली ही मोहीम आज दोन लाखांहून अधिक स्टार्टअप्सपर्यंत पोहोचली आहे. पहिल्या टप्प्यातील (FFS 1.0) यशानंतर, आता २.० टप्प्याद्वारे गुंतवणुकीचा वेग कायम राखला जाणार आहे. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट दीर्घकालीन देशांतर्गत भांडवल उभे करणे आणि व्हेंचर कॅपिटल इकोसिस्टम अधिक मजबूत करणे हे आहे. विशेष म्हणजे, एकट्या २०२५ सालात विक्रमी ४९,४०० स्टार्टअप्सची नोंदणी झाली असून सध्या भारतात १०० हून अधिक युनिकॉर्न्स कार्यरत आहेत.

### 'डीप टेक' आणि प्रगत संशोधनावर विशेष भर

योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात केवळ आयटी सेवांवर मर्यादित न राहता 'डीप टेक' (Deep Tech) आणि तंत्रज्ञान आधारित उत्पादन (Manufacturing) क्षेत्राला प्राधान्य दिले जाणार आहे. हाय-टेक प्रकल्पांना लागणारे दीर्घकालीन भांडवल आता सहज उपलब्ध होणार आहे. यामुळे शेती, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, रोबोटिक्स, स्पेस टेक, बायोटेक्नॉलॉजी आणि फिनटेक यांसारख्या १३०० हून अधिक स्टार्टअप्समध्ये आतापर्यंत २५,५०० कोटींची गुंतवणूक झाली असून ती आता अधिक वाढणार आहे.



### स्टार्टअप निकषांत बदल : टर्नओव्हर मर्यादा आता २०० कोटी

सरकारने स्टार्टअपची व्याख्या अधिक व्यापक करताना वार्षिक उलाढालीची मर्यादा १०० कोटींवरून थेट २०० कोटी रुपये केली आहे.

या निर्णयामुळे मध्यम आकाराच्या अनेक कंपन्यांना आता 'स्टार्टअप'चा दर्जा मिळून सरकारी सवलतींचा लाभ घेता येईल. तसेच, निधीचे योग्य वाटप आणि धोरणात्मक मार्गदर्शनासाठी एक 'सक्षमीकरण समिती' (Empowered Committee) देखील स्थापन करण्यात येणार आहे.

### ग्रामीण भारताचाही होणार विकास (विकेंद्रीकरण)

यावेळच्या निधीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे गुंतवणुकीचे विकेंद्रीकरण. आता स्टार्टअप्स केवळ मुंबई, दिल्ली किंवा बंगळुरूसारख्या महानगरांपुरते मर्यादित राहणार नाहीत. निमशहरी आणि ग्रामीण भागातील (Tier-2 Tier-3 शहरे) कल्पक उद्योजकांना प्रोत्साहन दिले जाणार आहे, जेणेकरून देशाच्या कानाकोपऱ्यातून नाविन्यपूर्ण कल्पना समोर येतील.

### नवीन उद्योजकांसाठी 'सेफ्टी नेट'

अनेक स्टार्टअप्स सुरुवातीच्या काळात निधीअभावी अपयशी ठरतात. ही जोखीम कमी करण्यासाठी 'अर्ली-ग्रोथ स्टेज'मधील उद्योजकांना या निधीतून आर्थिक सुरक्षा कवच (Safety Net) दिले जाईल. यामुळे पहिल्यांदाच उद्योग क्षेत्रात उतरणाऱ्या तरुणांना नवनवीन प्रयोग करताना भांडवलाची चिंता सतावणार नाही.

# टिपू सुलतान हे शिवाजी महाराजांच्या समकक्ष योद्धे होते; हर्षवर्धन सपकाळांच्या वक्तव्याने वादाचा भडका

मुंबई : ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी शौर्य आणि स्वराज्य असा विचार दिला, अगदी त्याचप्रमाणे टिपू सुलतान यांनी त्याच समकक्ष काम केले आहे. त्यामुळे टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे, असे वक्तव्य काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. मालेगाव महानगरपालिकेतील उपमहापौरांच्या दालनातील टिपू सुलतानाच्या छायाचित्रावरुन वाद निर्माण झाला असताना हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याने या आगीत आणखी तेल ओतले जाण्याची शक्यता आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचं शौर्य ज्याप्रकारचं आहे, त्यांनी जो स्वराज्या विचार दिला, त्याच मांदियाळीत, त्यांच्यानंतर बऱ्याच वर्षांनी टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्याविरोधात लढा पुकारला होता. त्या अर्थाने टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे युद्ध होऊ गेले, भारताचे भूमिपूत्र होऊन गेले, त्यांनी कधीही कोणत्याही विषारी, विखारी विचारांना जवळ केले नाही. त्यामुळे शौर्याचे लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांच्याकडे शिवाजी महाराजांच्या समकक्ष पाहिले पाहिजे, असे वक्तव्य हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. हर्षवर्धन सपकाळ



यांच्या या वक्तव्यावर भाजपच्या नेत्यांनी टीकेची झोड उठवली आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी बुलढाण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना हे वक्तव्य केले.

यावेळी हर्षवर्धन सपकाळ यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाबाबतही भाष्य केले. नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयात ५० हजाराची लाच घेतली, हे प्रकरण फार छोटं आहे. हे संपूर्ण सरकारच लाचखोर आहे. नरहरी झिरवल यांच्यावर कारवाई तर व्हायलाच पाहिजे (पान २ वर...)

# संत सेवालाल महाराज : सामाजिक पुनर्जागरणाचे प्रेरणास्थान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

१५ फेब्रुवारी हा दिवस केवळ एका संतपुरुषाची जयंती म्हणून साजरा होणारा दिवस नाही, तर तो भारतीय समाजाच्या उपेक्षित, वंचित आणि दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या घटकांच्या सामाजिक आत्मभानाचा उत्सव आहे. या दिवशी संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त देशभरात विशेषतः महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि मध्य भारतात लाखो अनुयायी श्रद्धेने नतमस्तक होतात. मात्र संत सेवालाल महाराजांचे स्मरण केवळ भक्तीपुरते मर्यादित न राहता त्यांच्या सामाजिक कार्याच्या व्यापक अर्थाने झाले, तरच ही जयंती खऱ्या अर्थाने साजरी झाली असे म्हणता येईल.

भारतीय समाजरचनेत बंजारा समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या भटक्या जीवनपद्धतीशी निगडित राहिला आहे. व्यापार, धान्यवाहतूक, गुरांचे कळप, जंगलांशी जोडलेले जीवन आणि सतत स्थलांतर या सगळ्या कारणांमुळे हा समाज मुख्य प्रवाहापासून दूर राहिला. स्थिर निवास नसल्यामुळे शिक्षण, आरोग्य, प्रशासन आणि राजकीय सहभाग यांपासून तो वंचित राहिला. अशा परिस्थितीत सामाजिक आत्मसन्मान हरवलेला, आत्मविश्वास खचलेला आणि अनेकदा स्वतःच्या अस्मितेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झालेला समाज संत सेवालाल महाराजांना लाभला.

संत सेवालाल महाराजांचे महत्त्व याच ठिकाणी ठळकपणे समोर येते. त्यांनी समाजाला प्रथम बाह्य शत्रूंचा नव्हे, तर अंतर्गत दुर्बलतेचा शोध घ्यायला शिकवले. समाजाची दारिद्र्य, उपेक्षा आणि अवहेलना ही केवळ इतरांनी लादलेली स्थिती नाही, तर काही प्रमाणात आत्मविस्मृती आणि विस्कळीतपणातूनही ती निर्माण झाली आहे, हा विचार त्यांनी ठामपणे मांडला. त्यामुळे त्यांच्या सामाजिक कार्याचा पाया आत्मशुद्धी आणि आत्मसन्मान यांवर आधारित होता.

संत सेवालाल महाराजांच्या विचारविश्वात व्यसनमुक्तीला अत्यंत मध्यवर्ती स्थान होते. त्या काळात मद्यपान, जुगार आणि अनियंत्रित खर्च यांमुळे अनेक बंजारा कुटुंबे आर्थिक व नैतिक अधःपतनाकडे झुकत होती. त्यांनी व्यसनाला वैयक्तिक दोष मानले नाही, तर सामाजिक आजार म्हणून पाहिले. व्यसन केवळ शरीर नष्ट करत नाही, ते विवेक, कुटुंब आणि समाज यांनाही पोखरते, हा त्यांचा ठाम संदेश होता. त्यामुळे त्यांनी कीर्तन, संवाद आणि प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे समाजाला संयमाचा मार्ग दाखवला.

त्यांच्या सामाजिक कार्यात श्रमसंस्कृतीचा पुरस्कार हा आणखी एक मूलभूत पैलू होता. श्रम हे लाजिरवाणे नाहीत, तर तेच माणसाचे खरे भूषण आहेत, असा विचार त्यांनी रुजवला. परिश्रमातून मिळवलेले अन्नच पवित्र असते आणि तेच आत्मसन्मान टिकवते, हे त्यांनी समाजाच्या मनात कोरले. भटक्या समाजाला 'आळशी' किंवा 'अविश्वसनीय' अशी लेबले लावली जात असताना, संत सेवालाल महाराजांनी श्रमशीलतेचा गौरव करून समाजाच्या प्रतिमेला नैतिक अधिष्ठान दिले.

स्त्रीसन्मान हा त्यांच्या सामाजिक विचारांचा अत्यंत प्रगत आणि कालातीत पैलू मानला जातो. ज्या काळात स्त्रीला बहुतेक समाजांत दुय्यम स्थान होते, त्या काळात संत सेवालाल महाराजांनी स्त्रीला कुटुंबाची आधारशिला मानले. त्यांनी पुरुषप्रधान मानसिकतेला थेट आव्हान दिले नाही, पण स्त्रीबद्दलचा आदर, संयम आणि जबाबदारी यांची शिकवण देऊन समाजमन बदलण्याचा प्रयत्न केला. स्त्रीचे शील म्हणजे केवळ तिची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे, हा संदेश त्यांच्या विचारांतून स्पष्टपणे उमटतो.

संत सेवालाल महाराजांनी अंधश्रद्धा आणि कर्मकांडालाही विरोध केला. धर्माच्या नावाखाली चालणारे अवास्तव विधी, आर्थिक शोषण आणि भीतीवर आधारित श्रद्धा यांना त्यांनी स्पष्ट नकार दिला. त्यांचा धर्म हा अत्यंत साधा, माणुसकीवर आधारित आणि व्यवहार्य होता. सेवाच खरी पूजा आहे, हा त्यांचा विचार केवळ आध्यात्मिक नव्हता, तर सामाजिक परिवर्तनाचा मंत्र होता. त्यामुळे त्यांच्या शिकवणीत बाह्य आडंबरांपेक्षा अंतःकरणातील शुद्धतेला अधिक महत्त्व होते.

निसर्गाशी असलेले नाते संत सेवालाल महाराजांच्या विचारांत विशेषत्वाने दिसते. जंगल, पाणी, पशुधन आणि भूमी या सगळ्यांवर बंजारा समाजाचे जीवन अवलंबून होते. त्यांनी निसर्गाला केवळ संसाधन न मानता सहजीवी घटक म्हणून पाहिले. वृक्षतोड टाळणे, पाण्याचा सन्मान राखणे आणि प्राणिमात्रांवर दया ठेवणे, हे केवळ नैतिक उपदेश नव्हते, तर जीवनरक्षणाचे तत्त्वज्ञान होते. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर हे विचार विलक्षण दूरदृष्टीचे वाटतात.

संत सेवालाल महाराजांचे कार्य केवळ वैयक्तिक सद्गुणांपुरते मर्यादित नव्हते; त्यांनी सामाजिक संघटन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. उपजाती, टोळीभेद, कौटुंबिक वाद आणि अंतर्गत मतभेद यांमुळे समाज विखुरलेला होता. त्यांनी एकतेचा संदेश देत समाजाला सांगितले की, विभाजनामुळे दुर्बलता येते, तर संघटनातून ताकद निर्माण होते. सामाजिक ऐक्य हा त्यांच्या विचारांचा कणा होता. त्यांनी शिक्षणाचा थेट प्रचार केला नसला, तरी त्यांच्या विचारांमुळे पुढील पिढ्यांमध्ये शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण झाली. आत्मसन्मान जागृत झाल्यानंतर समाजाने शिक्षणाकडे वळणे स्वाभाविक होते. आज बंजारा समाजातील अनेक युवक-युवती विविध क्षेत्रांत यशस्वी होत आहेत, त्यामागे संत सेवालाल महाराजांनी दिलेला आत्मविश्वास आणि स्वत्वाची जाणीव हे बीज आहे. त्यांचे स्वतःचे जीवन अत्यंत साधे, संयमी आणि



सेवाभावी होते. सत्ता, संपत्ती किंवा प्रसिद्धी यांचा मोह त्यांनी कधीच बाळगला नाही. समाजासाठी जगणे, समाजासाठी दुःख सहन करणे आणि समाजासाठी मार्गदर्शन करणे हेच त्यांचे जीवनतत्त्वज्ञान होते. त्यामुळेच ते संत होते, पण त्याहून अधिक सामाजिक दिशादर्शक होते.

संत सेवालाल महाराजांचे सामाजिक कार्य त्यांच्या काळापुरते मर्यादित नव्हते; त्याचे परिणाम पुढील अनेक पिढ्यांपर्यंत पोहोचले. त्यांनी समाजमनात जे बीज पेरले, ते पुढे आत्मसन्मान, शिक्षण आणि सामाजिक संघटनाच्या रूपाने अंकुरले. ज्या समाजाला दीर्घकाळ 'भटका', 'मुख्य प्रवाहाबाहेरील' किंवा 'दुय्यम' म्हणून ओळखले गेले, त्या समाजाने हळूहळू आपली ओळख स्वतः घडवायला सुरुवात केली. ही प्रक्रिया सहज किंवा तात्काळ घडलेली नव्हती; पण तिच्या मुळाशी संत सेवालाल महाराजांनी दिलेला आत्मविश्वासाचा संदेश होता.

स्वाभिमान ही केवळ भावनिक भावना नसून सामाजिक उभारणीचे बळकट अधिष्ठान असते, हे संत सेवालाल महाराजांनी ओळखले होते. त्यांनी समाजाला स्वतःकडे न्यूनगंडाने पाहू नका, तर आपल्या श्रमशीलतेचा, परंपरेचा आणि सांस्कृतिक वारशाचा अभिमान बाळगा, असे सांगितले. हा विचार पुढे बंजारा समाजाच्या सामाजिक चळवळींचा केंद्रबिंदू ठरला. आपल्या अस्मितेची जाणीव झाल्यानंतरच समाज शिक्षण, संघटन आणि हक्कांच्या दिशेने वाटचाल करू शकतो, हे त्यांच्या विचारांतून स्पष्ट होते.

स्वातंत्र्योत्तर काळात बंजारा समाजाने जेव्हा शिक्षणाकडे अधिक गांभीर्याने पाहायला सुरुवात केली, तेव्हा त्या मागे संत सेवालाल महाराजांच्या विचारांची प्रेरणा होती. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नव्हे, तर ते सामाजिक प्रतिष्ठा, विवेक आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग आहे, ही जाणीव समाजात हळूहळू रुजली. आज विविध विद्याशाखांमध्ये, प्रशासनात, संशोधनात, कला-संस्कृतीत आणि सामाजिक कार्यात जे बंजारा युवक-युवती सक्रियपणे कार्यरत आहेत, त्यांची ही वाटचाल संत सेवालाल महाराजांच्या सामाजिक दृष्टिकोनाचा आधुनिक विस्तार म्हणता येईल.

संत सेवालाल महाराजांचे विचार आजच्या सामाजिक वास्तवात अधिक तीव्रपणे लागू पडतात. वाढती व्यसनाधीनता, कौटुंबिक विघटन, पर्यावरणीय ऱ्हास आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास या सगळ्या समस्या आज समाजासमोर उभ्या आहेत. विशेषतः ग्रामीण आणि उपेक्षित घटकांमध्ये व्यसनाधीनतेमुळे आर्थिक व सामाजिक अधःपतन होत असल्याचे चित्र दिसते. अशा वेळी संत सेवालाल महाराजांचा संयम, स्वावलंबन आणि श्रमसंस्कृतीचा संदेश अत्यंत उपयुक्त ठरतो. त्यांनी व्यसनमुक्तीला केवळ नैतिक उपदेश म्हणून नव्हे, तर सामाजिक उन्नतीची अट म्हणून मांडले होते.

स्त्रीसन्मानाच्या बाबतीत संत सेवालाल महाराजांचा दृष्टिकोन आजही दिशादर्शक ठरतो. स्त्रीविषयक अत्याचार, असमानता आणि असुरक्षिततेचे प्रश्न आजही समाजात गंभीर आहेत. अशा वेळी त्यांनी दिलेला स्त्री-पुरुष परस्पर सन्मानाचा संदेश केवळ ऐतिहासिक नव्हे, तर वर्तमानकाळाशी थेट संवाद साधणारा आहे. त्यांनी स्त्रीला कुटुंबाचा आणि समाजाचा केंद्रबिंदू मानले. स्त्री सुरक्षित आणि सन्मानित असेल, तरच समाज सुदृढ राहील, हा विचार आजच्या स्त्रीसक्षमीकरणाच्या चर्चांशी सुसंगत आहे.

पर्यावरणसंवर्धनाचा प्रश्न आज जागतिक स्तरावर ऐरणीवर आहे. जंगलतोड, पाण्याची टंचाई, हवामान बदल आणि जैवविविधतेचा ऱ्हास या सगळ्या समस्या आधुनिक विकासाच्या अतिरेकातून निर्माण झाल्या आहेत. संत सेवालाल महाराजांनी निसर्गाशी सुसंवादाचे जे तत्त्व मांडले, ते आज 'शाश्वत विकास' या संकल्पनेशी जोडले जाते. त्यांनी निसर्गाला उपभोग्य वस्तू न मानता जीवनसहचर मानले. पर्यावरणाचे रक्षण म्हणजे पुढील पिढ्यांचे रक्षण, हा संदेश त्यांच्या शिकवणीत अंतर्भूत होता.

सामाजिक एकतेचा विचार हा संत सेवालाल महाराजांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा गाभा होता. आजही जात, पंथ, भाषा आणि आर्थिक स्तरांवर आधारित विभागणी समाजात दिसून येते. या विघटनकारी प्रवृत्तींमुळे सामाजिक सलोखा धोक्यात येतो. अशा परिस्थितीत संत सेवालाल महाराजांनी दिलेला संघटनाचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. त्यांनी समाजाला सांगितले की, अंतर्गत भांडणांत ऊर्जा खर्च करण्याऐवजी सामूहिक प्रगतीसाठी एकत्र येणे आवश्यक आहे.

आज संत सेवालाल महाराजांची जयंती विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम, भजन-कीर्तन आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांना अभिवादन केले जाते. परंतु या उत्सवांचा खरा अर्थ त्यांच्या विचारांचे आचरण करण्यात आहे. केवळ त्यांच्या प्रतिमेला हार घालणे पुरेसे नाही; त्यांच्या विचारांना आपल्या दैनंदिन जीवनात स्थान देणे हीच खरी श्रद्धांजली आहे.

विशेषतः तरुण पिढीसमोर संत सेवालाल महाराजांचे विचार नव्या स्वरूपात मांडण्याची गरज आहे. आधुनिक शिक्षण, तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाच्या काळात तरुणांमध्ये ओळखीचा, मूल्यांचा आणि सामाजिक बांधिलकीचा प्रश्न निर्माण होतो. अशा वेळी संत सेवालाल महाराजांचे जीवन तरुणांना सांगते की आधुनिकतेचा स्वीकार करताना आपली नैतिक मुळे विसरू नयेत. प्रगती आणि मूल्ये यांचा समतोल साधणे हेच खरे यश आहे.

संत सेवालाल महाराजांचे कार्य एका समाजापुरते मर्यादित न राहता संपूर्ण भारतीय समाजासाठी प्रेरणादायी ठरते. त्यांनी मांडलेली सेवा, समता आणि स्वाभिमानाची तत्त्वे कोणत्याही काळात कालबाह्य होत नाहीत. त्यांनी मानवतेचा धर्म शिकविला ज्यात जात, वर्ग किंवा पंथाचे बंधन नाही. त्यामुळेच त्यांचे विचार सर्वसमावेशक आणि सार्वकालिक ठरतात.

आज जेव्हा आपण १५ फेब्रुवारीला संत सेवलाल महाराजांची जयंती साजरी करतो, तेव्हा हा दिवस केवळ स्मरणाचा नसून आत्मपरीक्षणाचा असायला हवा. आपण समाजात व्यसनमुक्तीसाठी काय करतो? स्त्रीसन्मानासाठी किती जागरूक आहोत? पर्यावरणरक्षणासाठी आपले योगदान काय आहे? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण सामाजिक एकतेसाठी किती प्रयत्नशील आहोत? या प्रश्नांची उत्तरे शोधणे हीच जयंतीची खरी फलश्रुती आहे.

संत सेवालाल महाराज यांचे जीवन म्हणजे शांत पण प्रभावी सामाजिक क्रांतीचे प्रतीक आहे. त्यांनी तलवारीने नव्हे, तर विचारांनी समाज बदलला. त्यांनी घोषणा देऊन नव्हे, तर आचरणातून परिवर्तन घडवले. त्यांच्या विचारांचा प्रकाश आजही बंजारा समाजासह संपूर्ण समाजाला दिशा देत आहे. या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करूया. स्वाभिमानाने जगणे, श्रमाचा सन्मान करणे, स्त्रीला समान स्थान देणे, निसर्गाचे रक्षण करणे आणि समाजात एकतेचे बंध मजबूत करणे हीच संत सेवालाल महाराजांच्या सामाजिक कार्याची खरी ओळख आहे. त्यांच्या विचारांचा हा दीप पुढील पिढ्यांसाठी अखंड तेवत राहो, हीच या जयंती दिनी अपेक्षा.

**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

## आदिवासी सेवा संस्थेने मका खरेदी करा; शेतकऱ्यांचे बाराभाटी येथील संस्थेला निवेदन



बाराभाटी : स्थानिक ठिकाणच्या आदिवासी विविध सेवा सहकारी संस्था बाराभाटी आज दिनांक १४/०२/२०२६ रोजी आदिवासी संस्था बाराभाटी या कार्यालयामध्ये संस्थेचे व्यवस्थापक श्री राजेश चुलपार यांना रब्बी हंगाम २०२५/२०२६ मध्ये संस्थेमध्ये संस्थेच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांचा मका खरेदी करण्यात यावे. यासाठी निवेदन सादर करण्यात आले.

या करीता संस्थेचे कार्यक्षेत्रातील शेतकरी विलास बनसोड, श्रावण मेंढे, हेमराज बेलखोडे, बबलूजी भंडारी किशोर येरणे, महेश बेलखोडे, आनंदराव डोंगरावर, पृथ्वीराज खोब्रागडे, दादाजी शिवणकर, व इतर शेतकरी बांधव यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले. व मका खरेदी करण्या संदर्भात संस्थेचे सचिव यांनी सकारात्मक भुमिका दाखवून निवेदन स्वीकारले आहे.

## पुणे, छत्रपती संभाजीनगरमध्ये सेवा; देशातील 'एएआय' ची अकरा विमानतळांची यादी

पुणे : भारतीय विमानतळ प्राधिकरणांतर्गत (एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया-एएआय) पुणे आणि छत्रपती संभाजीनगर या विमानतळांवर भारत टॅक्सी सेवा सुरू करण्यात येणार आहे. 'एएआय' अंतर्गत असलेल्या देशभरातील विमानतळांमधून प्राथमिक स्तरावर राज्यातील दोन विमानतळांचा समावेश असून, या विमानतळावरील प्रवाशांना विश्वासार्ह आणि प्रवासीकेंद्री टॅक्सी सेवा मिळणार आहे. देशात ओला, उबर, रॅपिडो यांसारख्या ॲग्रीगेटर कंपन्यांविरोधातील तक्रारींच्या पार्श्वभूमीवर 'एएआय'ने राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ (एनसीडीसी) संचालित भारत टॅक्सी सेवा सुरू करण्याचा निर्णय ५ फेब्रुवारी रोजी घेतला. प्रायोगिक तत्त्वावर ही सेवा टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार असून, प्रथम 'एएआय'अंतर्गत असलेल्या राजकोट, पाटणा, वडोदरा, भूज, पुणे, छत्रपती संभाजीनगर, सुरत, कानपूर, वाराणसी, आग्रा आणि प्रयागराज या ११ विमानतळांवर भारत टॅक्सी सेवा सुरू करण्याबाबत प्रस्ताव तयार केला आहे. त्यानुसार प्रस्तावित टॅक्सी सेवा सुरू करण्यासाठी करार करण्यात आला आहे. अनेकदा रात्री-अपरात्री, तसेच दिवसा गर्दीच्या काळात खासगी सेवा पुरविणाऱ्या कंपन्या प्रवाशांकडून वाढीव शुल्क आकारत होत्या. मात्र, भारत टॅक्सीमुळे प्रवाशांना विमानतळावर उतरल्यानंतर किंवा जाण्यासाठी ठरावीक शुल्क आकारले जाणार आहे. पारदर्शक किंमत आणि कोणतेही वाढीव शुल्क नसल्याने प्रवाशांचा प्रवास सुलभ आणि सुरक्षित होणार आहे. भारत टॅक्सी या सेवेसाठी 'एनएसडीसी'ने सुरक्षित आणि सुलभ ॲप तयार केले आहे. त्यानुसार या ॲपवर चालकाने नोंदणी केल्यानंतर मूळ मालक तोच असून, ठरवून दिलेल्या किलोमीटर दराप्रमाणेच त्याला शुल्क आकारता येईल. संपूर्ण नफा हा चालकाच्या मालकाचा राहणार असून, हीच त्याची कमाई असणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.

## टिपू सुलतान हे शिवाजी महाराजांच्या समकक्ष योद्धे होते; हर्षवर्धन सपकाळांच्या वक्तव्याने वादाचा भडका

(पान १ वरून..) पण कोट्यावधी रुपये खाणारे देवेंद्र फडणवीसनवर काय कारवाई करणार हे आधी सांगा, या असंवैधानिक सरकारचा आम्ही निषेध करतो. अजितदादा आता राहिले नाही शरद पवार आणि अजित पवार हे महाराष्ट्राचे भूमिपुत्र आहेत, त्यांचा पक्ष त्यांच्या विचाराने चालेल का? तटकरे आणी पटेल हा पक्ष चालवणार आहेत हा कळीचा मुद्दा आहे. पटेल यांचा तो मी नव्हेच म्हणण्याचा जुना स्वभाव आहे ते पुन्हा एकदा महाराष्ट्र समोर आलं. अजित दादा हे चांगले प्रशासक होते. त्यामुळे त्यांच्या निधनाची बातमी आल्यानंतर त्यांच्या कार्यालयातील लोकांनी लूट करण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले.

भूम परंड्यात सहा महिन्यानंतर केंद्रीय पथक पाहणीसाठी आले. हे वरातीमागून घोडे आहे आणि आता शेतकऱ्यांना ते वाटाण्याच्या अक्षता लावून निघून जातील. मुनगंटीवारांचा बंगला घेण्याइतपत माझी ऐपत नाही. मात्र, रेडी रेकनरच्या दरात ते जर बोलत असतील तर मी त्यांना कळवेल. १७, १८ फेब्रुवारी रोजी आमची दोन दिवस बैठक आहे. संघटना बांधणीच्या हिशोबाने व पुढील वर्षभरात काँग्रेसने कोणत्या दिशेने वाटचाल करावी यासाठी ही बैठक आहे. संघटनात्मक बाबींची चर्चा आम्ही पक्षाच्या बैठकीत करू. अमेरिकेशी केलेल्या करारामुळे शेतकऱ्यांना कुठलाही फायदा होणार नाही नरेंद्र सरेंडर हे शेतकऱ्यांच्या गळ्यात फास लावल्यावरच शांत बसतील. महाविकास आघाडीत लवकरच संवादाची गरज आहे. भाजपाला विरोध म्हणून लवकरच हा संवाद घडून यायला हवा, अशी अपेक्षा यावेळी हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केले.

## भाटशिरपुरा येथील कै. भाई नारायणराव लोमटे माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी स्वयंशासन दिन



खामसवाडी, हनुमंत पाटुळे दि.१४ (प्रतिनिधी) : कळंब तालुक्यातील मौजे भाटशिरपुरा येथील कै.भाई नारायणराव लोमटे माध्यमिक विद्यालयात स्वयंशासन दिन व इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री.सुरेश टेकाळे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून कळंब तहसीलचे नायब तहसीलदार श्री. गोकुळ भराडिया, सेवा जेष्ठ शिक्षक श्यामसुंदर पाटील सर, ज्येष्ठ पत्रकार माधवसिंग राजपूत उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे नायब तहसीलदार गोकुळ भराडिया यांनी विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर चांगले मित्र जोडावेत, संगत चांगली निवडावी, तंत्रज्ञानाचा चांगल्या कामासाठी उपयोग करावा, मोबाईल सारख्या साधना द्वारे चांगली माहिती मिळते याचा उपयोग करावा, याचबरोबर प्रयत्न महत्त्वाचे आहेत यश निश्चित मिळते असे सांगितले. तर श्यामसुंदर पाटील यांनी अभ्यास, जिद्द ,चिकाटी, याला महत्त्व असून आपल्या परिस्थितीची जाण ठेवा, प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन मोठ्या हुद्द्यावर काम करीत असलेल्यांची प्रेरणा घ्यावी. या प्रसंगी त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन कार्य आत्मसात करावे असे सांगितले. तर माधवसिंग राजपूत यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात निश्चित ध्येय आत्मविश्वास,सकारात्मक विचार , व कौटुंबिक परिस्थितीची जाण ठेवावी. असे सांगून इयत्ता दहावी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तर अध्यक्षीय समारोपात शाळेचे मुख्याध्यापक सुरेश टेकाळे यांनी शाळेतील शिक्षकांडुन आपल्याला ज्ञानदान व संस्काराचे धडे दिले आहेत ही शिदोरी आपणास भावी आयुष्यासाठी कामी येईल असे सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत सत्कार करण्यात आला. या स्वयंशासन दिनी एकदिवसीय मुख्याध्यापक म्हणून प्रतिभा गायकवाड, उप मुख्याध्यापक कार्तिक शिंदे, शिक्षणाधिकारी अमृता तेलंग, उपशिक्षणाधिकारी रोहन शिरसट,गटशिक्षणाधिकारी राधिका पांचाळ, केंद्रप्रमुख प्रथमेश गायकवाड यांनी दिवसभर शाळेतील सर्व प्रशासकीय कामकाज पाहिले. या दिवशी इयत्ता दहावीतील सर्व विद्यार्थ्यांनी एकदिवसीय शिक्षकाचे कामकाज करून इयत्ता आठवीच्या व नववीच्या विद्यार्थ्यांना शिकविले. यावेळी इयत्ता आठवी व नववीच्या सर्व विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन शुभेच्छा देताना सर्व विद्यार्थी भावुक झाले होते. यावेळी नायब तहसीलदार गोकुळ भराडिया, ज्येष्ठ सेवानिवृत्त शिक्षक श्यामसुंदर पाटील सर, ज्येष्ठ पत्रकार माधव सिंग राजपूत , मुख्याध्यापक सुरेश टेकाळे, शरद सूर्यवंशी, श्रीकांत डिकले, एच. ए. पान ढवळे, बालाजी ओव्हाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांना शालांत परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी राधिका पंचाळ, प्रतिक्षा टेकाळे, कार्तिक शिंदे, अमृता तेलंग व इतर विद्यार्थ्यांनी आपाले मनोगत व्यक्त केले. शाळेची व सर्व शिक्षकांचे आम्हाला वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन लाभल्याबद्दल शिक्षकाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पशुधनाला केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## परळीतील 'महा पशुधन एक्स्पो' २०२६ ला मुख्यमंत्र्यांची भेट; मंत्री पंकजा मुंडेंची 'उद्योजक' योजनेची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड/परळी वैजनाथ (दि. १४): आमची माय आणि आमची माती हेच आमचे खरे प्रेम आहे. ज्याप्रमाणे शिवशंभूंच्या दर्शनापूर्वी नंदीला वंदन करण्याची आपली संस्कृती आहे, त्याच धर्तीवर पशुधनाला केंद्रस्थानी ठेवून आम्ही ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकट करत आहेत. तंत्रज्ञानाच्या जोडणीतून हे क्षेत्र महाराष्ट्राला जागतिक स्तरावर दुग्ध उत्पादनात अग्रेसर करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.




परळीतील अंबेजोगाई रस्त्यालगत ओपळे मैदानावर पशुसंवर्धन विभागातर्फे आयोजित तीन दिवसीय महा पशुधन एक्स्पोच्या पाहणीनंतर मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. याप्रसंगी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, आमदार रत्नाकर गुट्टे, पशुसंवर्धन विभागाचे सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन, आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठम कुलगुरू डॉ. नितीन पाटील, पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे, खासगी सचिव मंदार वैद्य, अपर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे, उपविभागीय अधिकारी अरविंद लाठकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, पशुसंवर्धन विभागाचे सह आयुक्त, बहुसंख्येने पशुपालक उपस्थित होते.

**शेतीला 'क्लायमेट रिस्क' मधून वाचवणार**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हे प्रदर्शन केवळ एक सोहळा नसून कोरडवाहू शेतीतील हवामान जोखीम (उश्रळारींश ठळीज़) कमी करण्यासाठी उचललेले एक धोरणात्मक पाऊल आहे. पिकांचे नुकसान झाले तर पशुधन हेच शेतकऱ्यासाठी आधार म्हणून काम करते. त्यामुळेच आम्ही गाईला केवळ धार्मिक महत्त्व न देता तिचे आर्थिक योगदान लक्षात घेऊन 'राज्यमाता' असा दर्जा दिला आहे.

**तंत्रज्ञानाची कास: ख आणि एम्ब्रियो ट्रान्सप्लांट**

दुग्ध व्यवसायातील तफावत मांडताना मुख्यमंत्री म्हणाले, पंजाबमध्ये गाय १०-१५ लिटर दूध देते, तर आपल्याकडे २.५ लिटर ही तफावत भरून काढण्यासाठीचे प्रयत्न सुरु आहेत. पशुधन संवर्धन, आरोग्य व अचूक निरीक्षण आणि उत्पादकता वाढविण्यासाठी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ख) मिशन' चा वापर करण्यात येईल. एम्ब्रियो ट्रान्सप्लांट आणि सेक्स-सॉर्टेड सीमेन तंत्रज्ञानाद्वारे उच्च दर्जाच्या कालवडींची पैदास वाढवून दुग्धोत्पादन वाढवले जाईल. यासाठी विदर्भ- मराठवाड्यात 'मदर्स डेअरी' सोबत करार देखील करण्यात आला आहे.

**अफवांवर विश्वास नको**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृषी क्षेत्राला जागतिक स्पर्धेपासून सुरक्षित ठेवले आहे. भारत- अमेरिका करारात सोयाबीन किंवा कापूस आयातीचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे बाहेरील माल येऊन भाव पडतील, या अफवांवर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. याउलट भारतीय शेतकऱ्यांना अमेरिकेची मोठी बाजारपेठ आता खुली झाली असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**गावातला तरुण होईल 'पशुधन उद्योजक' - मंत्री पंकजा मुंडे**

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, केवळ नोकरीच्या मागे न लागता गावातील तरुणांनी मालक बनावे, यासाठी आम्ही लवकरच 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना' आणत आहोत. महिलांना लखपती दीदी बनवण्यासाठी शासनाकडून शून्य टक्के व्याजावर कर्ज उपलब्ध करून देत आहे. तसेच पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा देणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. हा दर्जा दिल्याबद्दल मंत्री मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनीही परळीच्या विकासासाठी मुख्यमंत्र्यांसमोर मागण्या मांडल्या. तसेच बीड व परळीचे विकासासाठी कायम निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानले.

**विजेत्यांचा गौरव**

अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी पालन योजनेतील विजेत्यांना आणि गोपाळ रत्न पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांना यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पशुसंवर्धन विभागाच्या 'महा-पशुधन वार्ता' या मासिकाच्या १० व्या अंकाचे प्रकाशन व विभागाच्या 'दिनदर्शिका २०२६'चे अनावरण केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'महा-पशुधन एक्स्पो २०२६'मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत पात्र महिला बचत गटांना प्रातिनिधिक स्वरूपात कर्ज वितरण केले. जिरेवाडी, ता. परळी येथील तुळजाई महिला स्वयंसहायता समूहास ₹१५,००,००० इतक्या कर्जाचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) च्या स्मार्ट प्रकल्पांतर्गत बर्दापूर येथील 'उमेद सखी - महिला शेतकरी उत्पादक कंपनी'ला शासन अनुदानाच्या ₹१२,२७,५०० या प्रथम हप्त्याचे वितरण करण्यात आले.

**सामंजस्य कराराचे प्रतिकात्मक हस्तांतरण**

विदर्भ मराठवाडा दुग्धोत्पादन प्रकल्प आणि पशुधन विकास महामंडळ नागपूर यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराचे प्रतिकात्मक हस्तांतरण यावेळी करण्यात आले. पशुधन विकास मंडळ नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी शितल मुकणे आणि मुख्य शास्त्रज्ञ महात्मा फुले कृषी विद्यापीठ सोमनाथ माने त्यासोबतच डॉ. दिनकर बोर्डे उपायुक्त पशुसंवर्धन जिल्हा परिषद सातारा व विदर्भ मराठवाडा उत्पादन प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय गोराडे यांना यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कराराच्या प्रति हस्तांतरित करण्यात आल्या.

**दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली, स्मृती दालनाचे उद्घाटन**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रदर्शनामध्ये असलेल्या विविध पशुधनाची पाहणी केली. पाहणीत त्यांनी पशु पालकांचे कौतुक केले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार स्मृती दालनाचे उद्घाटनही त्यांनी केले. मुख्य कार्यक्रमस्थळी सुरुवातीला राष्ट्रगीत, राज्यगीत झाल्यानंतर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. परळी नगरपरिषदेच्या स्व. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाचे दूरदृश्य प्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आले.

केंद्र सरकारच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय गोपाल रत्न - २०२५ पुरस्कार घोषणा करण्यात आली असून राज्यातील दोन पशुपालकांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रगतीशील पशुपालक श्रद्धा ढवण यांची निवड झाली आहे. या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्रीमती ढवण सत्कार करण्यात आला. तसेच लाल कंधारी व देवणी गट पशु पालकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. सायली संजीव यांनी सूत्रसंचालन केले. सचिव डॉ. एन. रामास्वामी यांनी आभार मानले. या सोहळ्याला परळीतील नागरिक आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी अलोट गर्दी केली होती.

**मुख्यमंत्र्यांच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे**

उदगीर प्रकल्प: उदगीरचे दूध भुकटी केंद्र १०० कोटी खर्चून पुन्हा सुरू करणार.

नैसर्गिक शेती: रासायनिक खतांमुळे बिघडलेला जमिनीचा पोत सुधारण्यासाठी गोमूत्र व शेणापासून तयार होणाऱ्या 'जीवामृता'ला प्रोत्साहन.

आरोग्य सेवा: राज्यातील २८४१ पशु दवाखान्यांचे आधुनिकीकरण आणि फिरत्या पशु म्ब्युलन्स सेवेचे जाळे.

विकास दर: पशुसंवर्धन क्षेत्राचा विकास दर सध्याच्या ४-८% वरून २५% पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट.

राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत महाराष्ट्रातील ३६६ प्रकल्पांना मंजुरी.

---

## डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालयामध्ये जिमखाना डे व पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला / प्रतिनिधी : शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला मध्ये जिमखाना डे व पारितोषिक वितरण सोहळा निमित्त अनेक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले. सकाळी ९:०० वाजता पारंपरिक वेशभूषा दिन हा कार्यक्रम साजरा झाला. त्यानंतर सकाळी १०:०० वाजता फनी गेम्सचे उदघाटन संस्थेचे संचालक प्रा. अशोक शिंदे, प्रा.दिपक खटकाळे, प्रा. जयंत जानकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिकंदर मुलाणी, जिमखाना डे व पारितोषिक वितरण सोहळा कमिटीचे चेअरमन प्रा. अशोक कांबळे यांच्या उपस्थिती मोठ्या उत्साहात संपन्न झाले. दुपारी १२ वाजता फॅन्सी ड्रेस स्पर्धेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला त्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वेशभूषा सादर केलेल्या होत्या.

दुपारी २:०० ते ५:३० या वेळेत पहिल्या दिवसातील मुख्य कार्यक्रम म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. त्याचे उदघाटन संस्थेचे सचिव विठ्ठलराव शिंदे, सांगोला पोलीस स्टेशनचे महिला पोलीस अधिकारी कु. स्नेहल चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिकंदर मुलाणी, सांस्कृतिक कार्यक्रम कमिटीचे चेअरमन प्रा.धनाजी भानवसे यांच्या उपस्थित मोठ्या उत्साहात संपन्न झाला. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये लावणी, पोवाडा, सोलो डान्स असे विविध नाट्य प्रकार संपन्न झाले. सदर कार्यक्रमाध्ये कॉलेजमधील विद्यार्थी, विद्यार्थीनी यांनी मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता.

---

खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रयत्नामुळे

## मुगडा तालुक्यातील डोंगर गावातील दीर्घकाळचे लोडशेडिंग तात्काळ बंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा तालुक्यातील डोंगरगाव मुक्काम पोस्ट (होमनाळ उपकेंद्र अंतर्गत) येथे सुरू असलेल्या दीर्घांच्या वीज लोड शेडिंग मुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत होता दररोज सकाळी पाच ते नऊ पॉईंट पंधरा वाजेपर्यंत तसेच सायंकाळी ५:१५ ते ७.१५ वाजेपर्यंत अशा तब्बल सात तासाच्या वीज कपातीमुळे विद्यार्थ्यांची शिक्षण, व शेतकऱ्यांचे पाणीपुरवठा व शेतीकाम लघुउद्योग याबाबत तसेच घरगुती कामकाज पूर्णपणे विस्कळीत होत होते वृद्ध आजारी व लहान मुलांसाठी यांचा मोठा त्रास होत असल्याने डॉक्टर नंदकिशोर शिंदे व ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले होते.

गंभीर गंभीर भाभीजी तात्काळ दखल घेत खासदार पणती शिंदे यांनी अधीक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनी सोलापूर यांच्याकडे निवेदन सादर करून डोंगर गावातील लोड शेडिंग वर त्वरित उपाययोजना कराव्यात मागणी केली होती. खासदार प्रणिती शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे महावितरण ने तात्काळ कारवाई करण्यात संबंधित उपकेंद्रातील लोड शेडिंग बंद केले, डोंगरगाव परिसरातील वीजपुरवठा सुरळीत झाला असून तेथील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. तात्काळ दिलेल्या दिल्यासाठी ग्रामस्थांनी खासदार पणेती शिंदे यांचे मनापासून आभार मानले आहे.

---

## सुस्ते गणातून पंचायत समिती सदस्यपदी सौ. सावली गायकवाड यांच्या निवडीबद्दल सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार (उद्योग व व्यापार विभाग) पंढरपूर तालुकाध्यक्षा सौ. सावली अतुल गायकवाड यांची सुस्ते गणातून पंचायत समिती सदस्य पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हा सत्कार सोहळा प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या संपर्क कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी सौ. गायकवाड यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. सावली गायकवाड यांच्या निवडीमुळे उद्योग व व्यापार विभागासह ग्रामीण भागातील प्रश्नांना अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त करत फाटे यांनी त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला पंढरपूर तालुक्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती लावून नवनियुक्त पंचायत समिती सदस्यांचे अभिनंदन केले. योगेश ताड (संचालक, सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना) नवनाथ बचूटे (उद्योजक) भास्कर गायकवाड (उद्योजक) ज्ञानेश्वर पवार निवृत्ती भटकर किशोर नपते शरद थिटे श्रीधर पिसे यांच्यासह अन्य उपस्थित होते. आपल्या निवडीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना सौ. सावली गायकवाड यांनी, पक्षार्पणामुळे मिळालेल्या या संधीचा उपयोग जनसेवेसाठी आणि सुस्ते गणाच्या विकासासाठी प्रामाणिकपणे करेन, असे प्रतिपादन केले.

---

धाराशिव पोलिसांची मोठी कारवाई

## अफूची शेती उघड; १५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/ सुधाकर रणदिवे :

धाराशिव जिल्ह्यात पोलिसांनी अफुची लागवड करणाऱ्या विरोधात कारवाईची मोहीम उघडली आहे. कळंब पोलीस स्टेशन हद्दीतील कन्हेरवाडी शिवारात अफूची लागवड करणाऱ्या विरोधात कारवाई करीत १५ लाख रुपयांची अफूची झाडे जप्त करण्यात आली आहेत.

कन्हेरवाडी ते मांडवा जाणाऱ्या रस्त्यालगत विलास नवनाथ कवडे यांच्या शेतामध्ये अफूची झाडे लावलेली असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता अंदाजे १०० किलो अफूची झाडे आढळून आली. सदर कारवाई दोन शासकीय पंच,नायब तहसीलदार, कृषी अधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आली. संपूर्ण कारवाईची व्हिडिओग्राफी करण्यात आली असून घटनास्थळी पंचनामा करून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास कळंब पोलीस करीत आहेत. पोलीस अधीक्षक रितु खोकर,अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना, विभागीय पोलीस अधिकारी कळंब, पोलीस निरीक्षक अजित चिंतालेसपोनि मगर, पोउपनि घाडगे, पोह शिंदे,पोका जाधवर,पोना गजभार, करवर, मंगनाळे,मुंढे यांचा पथकात समावेश होता.



---

## दिशा महाराष्ट्राची वाहिनीच्या द्वारे सन्मान कर्तृत्वाचा गौरव स्त्री वर्गाचा कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी मुंबई दि. १३ (रामदास धो. गमरे) दिशा महाराष्ट्राची या धेंढीलश चॅनेल च्या माध्यमातून गेली चार वर्षे अनेक स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत असून त्याद्वारे महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना सन्मानित करून गौरविण्यात आले आहे, तसेच मराठी भाषा, साहित्य, चर्चा, परिसंवाद, कविसंमेलन सद्य घडामोडींवर लिखाण करून प्रसिद्ध करणे असे अनेक उपक्रम राबविण्यात आले आहेत त्याच पार्श्र्भूमीवर जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून उत्सव महिला दिनाचा सन्मान स्त्री जन्माचा या माध्यमातून आपल्या कर्तुत्वाने विविध क्षेत्रात आपला ठसा उमटविणाऱ्या ५० महिलांची निवड करून त्यांना राज्यस्तरीय माता सावित्रीबाई फुले सन्मान गौरव पुरस्कार २०२६, राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ सन्मान गौरव पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सदर पुरस्कार समाजिक, राजकीय, सहकार, शिक्षण, उद्योग, कृषी, साहित्य, क्रीडा, अध्यात्म, पत्रकारिता, युवा, डॉक्टर, महिला बचत गट या नामांकन विभागांतर्गत विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना सन्मानित करण्यात येणार असून सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि मानाचा फेटा असे पुरस्काराचे स्वरुप आहे. सदर कार्यक्रम रविवार दि. १५ मार्च २०२६ सकाळी १०:३० ते ४:३० वेळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता भवन, प्लॉट नं. ४१, तेजस्विनी वर्किंग वुमन्स हॉस्टेल समोर, सेक्टर नं. १०, जुईनगर येथे आयोजित करण्यात आला आहे तरी इच्छुक महिलांनी दिशा महाराष्ट्राची वाहिनीचे प्रमुख संपादक तुषार गौतम नेवरेकर यांना ७२१८४६७९६३ या भ्रमणध्वणी वर संपर्क साधून आपला प्रस्ताव पाठवावा असे आवाहन दिशा महाराष्ट्राची वाहिनीचे प्रमुख संपादक तुषार गौतम नेवरेकर यांनी केले आहे.

# ‘विकसित नागपूर-२०४७’ आराखड्याची कालबद्ध पद्धतीने अंमलबजावणी होईल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ‘मित्रा’ संस्थेच्या वतीने नागपूर विभाग शाश्वत विकासाच्या रणनीतीवर आधारित कार्यशाळेचा समारोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : विकसित भारत आणि महाराष्ट्राचे ध्येय डोळ्यापुढे ठेऊन तयार झालेला ‘विकसित नागपूर-२०४७’ हा दीर्घकालीन, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकास आराखडा हा केवळ दस्तऐवज रा-हणार नाही, तर राज्य सरकारच्या वतीने या आराखड्यातील प्रत्येक घटक आणि रणनीतीवर कालबद्ध पद्धतीने काम केले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) या संस्थेच्या वतीने नागपूर विभागाच्या शाश्वत विकासाच्या रणनीतीवर आधारित कार्यशाळेच्या समारोप सत्रात मुख्यमंत्री बोलत होते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या सभागृहात या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, वित्त व नियोजन राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या मियो ओका तसेच ‘मित्रा’चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी तसेच विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

विकसित नागपूरच्या या प्रवासाची सुरुवात या आराखड्याच्या निर्मितीसह होत आहे, याबद्दल समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्राचा आणि पर्यायाने नागपूर क्षेत्राचा विकास कुठल्या पद्धतीने व कोणत्या बाबींच्या प्राधान्यावर होणार याचा हा एक सुसंगत आराखडा आहे. त्यात कुठल्या क्षेत्रात आणि कुठल्या रणनीती वापराव्या लागतील, यावर व्यापक चर्चा झाली आहे. या व्हिजनच्या अंमलबजावणीची जबाबदारी मित्रा संस्थेकडे सोपविण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला ‘विकसित भारत-२०४७’ चे स्वप्न दिले आहे. त्यासाठी तीस ट्रिलियनच्या अर्थव्यवस्थेचे लक्ष्य बाळगले गेले आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्र विकसित अर्थव्यवस्थेच्या मापदंडांमध्ये येतील. सुरुवातीला हे स्वप्न फार लांबचे वाटू शकते. आमच्याकडे केवळ दोन दशकांचा कालावधी आहे. एका बाजूला आव्हान आहे तर दुसऱ्या बाजुला मोठ्या प्रमाणात दिसणाऱ्या संधीही आहेत. या आराखड्याच्या माध्यमातून तयार झालेले ‘व्हिजन’ हे या दोन बाबींमधील पुलाची भूमिका बजावू शकते, याकडे मुख्यमंत्री फडणवीस लक्ष वेधले.






विकास आणि वाढ ही सर्वसमावेशक आणि न्याय्य असली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करून मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्र ही भारतातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे; मात्र, राज्यातील सुमारे पंचवीस जिल्हे या अर्थव्यवस्थेत अधिक मोठे योगदान देण्याची आकांक्षा बाळगून आहेत. प्रत्येक जिल्हा हा विकासाचे गतिमान केंद्र असायला हवा. प्रत्येक जिल्ह्यातील शक्तीस्थाने व संधींचा वापर करुन योग्य रणनीतीच्या माध्यमातून या जिल्ह्यांमधील आर्थिक आणि रोजगाराचे चित्र बदलता येईल. नागपूर हे केंद्र मानून सर्व सहा जिल्हे विकसित करण्याची ही संधी आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले, विकासाच्या आराखड्याची अंमलबजावणी करताना तंत्रज्ञानाचा वापर ‘फोर्स मल्टीप्लायर’ ठरेल. केंद्र सरकारचा गतीशक्ती प्लॅटफॉर्म हे त्याचे ठळक उदाहरण आहे. या प्लॅटफॉर्ममुळे पायाभूत सुविधाच्या योजना हाती घेताना त्यांचे नियोजन अतिशय सुलभ झाले आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. ‘विकसित नागपूर-२०४७’ चा आराखडा पूर्ण विचारांती तयार झालेला असून तो अतिशय वास्तववादी आहे, असा अभिप्रायही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जीआयएस मित्रा या ॲपचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. विविध क्षेत्रातील विकासाच्या संधी आणि रणनीती यावर विविध गटांच्या वतीने सादरीकरण करण्यात आले. याप्रसंगी, ‘मित्रा’ आणि व्हिएनआयटी, आयआयएम नागपूर आणि वाधवानी फाऊंडेशन यांच्यात तीन स्वतंत्र सामंजस्य करार पार पडले.

---

# सैनिक स्कूल तुळजापूर येथे स्वयंशासन दिन व निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : तुळजापूर येथील शैक्षणिक गुणवत्ता व विविध नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी बहुचर्चित असलेल्या श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तुळजापूर येथे आज दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी स्वयंशासन दिन म्हणजेच स्कूल डे आयोजित करण्यात आला होता. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवस शिक्षक म्हणून कार्य करणे ,दिवसभराचे कामकाज करणे अध्यापन करणे या बालवयात शिक्षक होण्याचा मान सन्मान, कमांडट म्हणून पद भूषवण्याचा ,प्राचार्य होण्याचा मानसन्मान व आनंद काही औरच असतो . आज दिवसभर स्वयंशासन दिनाचे विद्यार्थी कमांडट निखिल मगर, प्राचार्य समर्थ लगडे तर पर्यवेक्षक म्हणून अथर्व चौधरी यांनी काम पाहिले . या कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे प्राचार्य श्रीमान घोडके सर पर्यवेक्षक डॉ. पेटकर सर तसेच आजच्या दिवसाचे कमांडर ,प्राचार्य, पर्यवेक्षक व इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक श्री पडनुर श्री चव्हाण यांच्या हस्ते महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व दीप प्रज्वलन करण्यात आले . याप्रसंगी विद्यालयातील संगीत चमूने सुंदर असे स्वागत गीत गायले . याप्रसंगी विद्यालयातील इयत्ता दहावीच्या आदेश कदम ,पार्थ पाटील, उत्कर्ष गवळी ,सोहम जाधव आणि समर्थ लगडे आदींनी भाषणे केली .आपल्या मनोगतातून त्यांनी माझी शाळा सुंदर शाळा लाविते लळा जसा माऊली बाळा ! शाळेबद्दल प्रेम आपुलकी व्यक्त केली. आज आम्ही सर्वजण या शाळेमुळेच घडलो, सैनिकी शिस्त काय असते ? ड्रिल काय असते? संचलन काय असते ?याची संपूर्ण माहिती आम्हाला मिळाली. असे मनोगत सर्वांनी व्यक्त केले . सर्व शिक्षकांचे अभिनंदन करत आभार मानले विद्यालयाचे प्राचार्य श्रीमान घोडके सर यांचे उत्कृष्ट नियोजन, मार्गदर्शन, धाडसी पणा, नेतृत्वगुण, भाषा व

वाणी चा प्रभाव सर्वांना आपल्या सोबत घेऊन शाळेचा विकास करणे हा विशेष गुण आम्ही त्यांच्याकडून शिकलो. आहोत भविष्यात आम्ही जिथे जाईल तेथे शाळेची आठवण आमच्या हृदयात राहील अशी भावना व्यक्त केली . याप्रसंगी विद्यालयातील श्री स्वामी सर व डॉ. वडवराव सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या व जीवनात यशस्वी होण्यासाठी एकाग्रता, मेहनत व अभ्यास आवश्यक आहे असे प्रतिपादन केले . मोठी स्वप्ने बघा व स्वप्ने पूर्ण करण्याच्या मागे लागा असेही त्यांनी सांगितले . सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन धीरज जमदाडे आणि अथर्व मुंडे या विद्यार्थ्यांनी केले तर आभार प्रगट करण्याचे काम गुरव या विद्यार्थ्यांनी केले सदरील सदरील कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री दिलीप सलगर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शेवटी वंदे मातरम या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली .

---

# शिवजयंती निमित्ताने वागदरी येथे शिव सप्ताहाचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : सालाबाद प्रमाणे तुळजापूर तालुक्यातील मौजे वागदरी येथे शिवजयंतीच्या निमित्ताने दि.१३ फेब्रुवारी २२६ रोजी शिव सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले असून दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान शिव सप्ताह निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दिनांक १९ फेब्रुवारी २२६ रोजी भव्य मिरवणुकीने या सप्ताहाची सांगता करण्यात येणार आहे.

. शिव- बसव- राणा व काशीबा महाराज जन्मोत्सव मंडळ वागदरी ता. तुळजापूरच्या वतीने दरवर्षी शिवजयंतीचे औचित्य साधून शिव सप्ताहाचे आयोजन करण्यात येते.याही वर्षी जन्मोत्सव मंडळाच्या वतीने शिव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून दिनांक

**विविध कार्यक्रमाचे केले आयोजन**

१३ फेब्रुवारी २२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा बसवेश्वर, महाराणा प्रताप व श्री संत काशिबा महाराज यांच्या प्रतिमांची प्रतिष्ठापना करून शिव सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले असून या निमित्ताने दि. १४ फेब्रवारी रोजी शिवपुजा, दि.१५ फे. रोजी महाशिवरात्री, दि.१६ फेब्रुवारी रोजी शालेय विद्यार्थ्यांची सामान्य ज्ञान स्पर्धा, दि.१७ फेब्रुवारी रोजी सकाळी शिव पुजा व भव्य रक्तदान शिबिर, दि. १८ फेब्रूवारी रोजी महिलांचा सांस्कृतीक कार्यक्रम तर दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर, महाराणा प्रताप व श्री संत काशिबा महाराज यांच्या प्रतिमांची पालकीतून भव्य मिरवणूक काढून या शिव सप्ताहाची सांगता करण्यात येणार आहे. तर सामान्य ज्ञान स्पर्धेत प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या स्पर्धकाना अनुक्रमे ११०००,५०००,२५०० रु रोख रक्कम व प्रत्येक सहभागी स्पर्धकाना स्कूल बॅग व शालेय साहित्य देण्यात येणार आहे.असी माहिती जन्मोत्सव मंडळाच्या वतीने उद्घाटन प्रसंगी देण्यात आली.



. या वेळी अँड.अमोल पाटील, जन्मोत्सव मंडळाचे अध्यक्ष प्रशांत यादव, उपाध्यक्ष रवी यादव, सचिव भगतसिंग ठकूर, मिरवणूक प्रमुख रामसिंग चव्हाण,रमेश पवार,सह जेष्ठ नागरिक व युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# किल्लारी येथे आयोजित पाचव्या विशाल बौद्ध धम्म परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : भदंत धम्मसार थेरो यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : किल्लारी तालुका औसा जिल्हा लातूर येथे तक्षशिला बुद्ध विहार तथागत बुद्ध गार्डन ग्रामीण रुग्णालयाच्या पाठीमागे गुरुवार दिनांक २६ फेब्रुवारी २२६ रोजी सकाळी ठिक १ वा. ते सायंकाळी ठिक ६ वा.दरम्यान पाचव्या विशाल बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले असून या बौद्ध धम्म परिषदेस लातूर व धाराशिव जिल्ह्यातील तमाम श्रध्दासंपन्न बौद्ध उपासक उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन या धम्म परिषदेचे मुख्य आयोजक पूज्य भदंत धम्मसार थेरो यांनी केले आहे.

. बौद्ध धर्म हा मानवतेची शिकवण देणारा असून या धम्मात कर्माला फार महत्व आहे.बौद्ध धम्माचा विचार हा मानवतेचा विचार आहे हा मानवतेच्या समतेच्या विचारांचा प्रसार व्हावा आणि संबंध मानव जातीकडून बौद्ध धर्माच्या विचारांचे आचरण व्हावे या उद्देशाने बौद्ध धम्माच्या विचाराचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी किल्लारी



येथील तक्षशिला बुद्ध विहाराच्या प्रांगणामध्ये दरवर्षी विशाल बौध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात येते.याही वर्षी गुरवार दिनांक २६ फेब्रुवारी २२६ रोजी धम्मगुरु पूज्य भदंत डॉ.उपगुप्त महाथेरो कार्याध्यक्ष अखिल भारतीय भिकू संघ बुद्ध गया यांच्या अध्यक्षतेखाली तर देशाचे सामाजिक न्याय व अधिकारता राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष नामदार रामदास आठवले व औसा विधानसभा मतदार संघाचे आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पाचव्या विशाल बौद्ध धर्म परिषदेचे आयोजन करण्यात आले असून या धम्म परिषदेस लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील श्रद्धासंपन्न बौद्ध उपासक उपासिकेने व बौद्ध बांधवांनी,आंबेडकरी अनुयायांनी तक्षशिला बुद्ध विहार तथागत बुद्ध गार्डन ग्रामीण रुग्णालयाच्या पाठीमागे किल्लारी या ठिकाणी . मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पूज्य भदंत धम्मसार थेरो यांनी नळदुर्ग येथे या धम्म परिषदेच्या प्रसार आणि प्रचारादरम्यान दौऱ्यावरआले असता उपसकाशी बोलताना केले.

---

## ‘एनसीआय’मध्ये’ ऑन्कोलॉजी बियॉन्ड बॉर्डर्स’ परिषदेचे उद्घाटन

# कर्करोगाच्या बाबतीत केवळ उपचारांवर भर न देता प्रतिबंध आणि निदानावरही विशेष लक्ष देणे आवश्यक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : गेल्या दशकभरात कर्करोगाच्या घटनांमध्ये प्रचंड वेगाने वाढ होत आहे. भारतासारख्या देशाने आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली असली, तरी सध्या कर्करोग हा आरोग्य व्यवस्थेसमोरील सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक आहे. ही समस्या केवळ भारतापर्यंत मर्यादित नसून जागतिक स्तरावरही तीव्रतेने जाणवत आहे. त्यामुळे केवळ उपचारांवर भर न देता प्रतिबंध आणि निदान यावरही विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या ‘ऑन्कोलॉजी बियॉन्ड बॉर्डर्स’ या जागतिक परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी एनसीआयचे अध्यक्ष ॲड. सुनील मनोहर, एनसीआयचे महासचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश जोगळेकर, कोषाध्यक्ष आनंद औरंगाबादकर, वैद्यकीय संचालक डॉ. आनंद पाठक, तसेच एनसीआयचे ग्लोबल ऑपरेशन्स अँड स्ट्रॅटेजी डायरेक्टर शशी मंदापती यांच्यासह आरोग्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कोणताही आजार किंवा विकार सीमा ओळखत नाही, तो व्यक्तीची सामाजिक-आर्थिक स्थिती पाहत नाही. अशा परिस्थितीत सर्वांनी एकत्र येऊन विचारांची देवाणघेवाण करणे आणि सीमांच्या पलीकडे जाऊन उपाय शोधणे ही आपली जबाबदारी आहे. ही परिषद केवळ चर्चेसाठी मर्यादित नसून, व्यापक दृष्टीकोनातून विचार करण्याचे व्यासपीठ असल्याचे देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटसारखी संस्था उभी राहिल्याने केवळ भारतातीलच नव्हे, तर विविध देशांमधील रुग्णांनाही उपचाराची सुविधा मिळत आहे. अशा अधिकाधिक संस्थांची देशाला गरज आहे. या अनुषंगाने आपल्या राज्यात ‘महा कॅन्सर फाऊंडेशन’ची स्थापना करण्यात आली असून या संस्थेमार्फत संपूर्ण राज्यात ‘हब मॉडेल’च्या आधारे कॅन्सर ग्रिड उभारली जात आहे, ज्यामुळे राज्यातील प्रत्येक नागरिकाला कर्करोगावर दर्जेदार उपचार उपलब्ध होईल, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

कर्करोग उपचाराच्या क्षेत्रात अधिक संशोधन, नवोन्मेष, मेडटेक, बायोटेक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा व्यापक वापर आवश्यक आहे. विशेषतः वेळेत निदान आणि प्रारंभिक टप्प्यातच कर्करोगावर प्रभावीपणे मात करण्यासाठी तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होण्याची गरज त्यांनी यावेळी अधोरेखित केली.

कार्यक्रमादरम्यान नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट आणि गयाना या देशातील आरोग्य विभागादरम्यान कर्करोग उपचारपद्धती या संदर्भातील एमओयु करण्यात आला. तसेच ‘द विंग्स’ या वैज्ञानिक वृत्तपत्रिकेच्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.